वाचले :- १. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. पीसीसी-२०१३/प्र.क्र.६०१/नवि-२२, मंत्रालय मुंबई – ४०००३२,दि. ०४ मार्च २०१४.

२. मा. विधी समिती ठराव क्र. २६, दि. १५/०९/२०१७

३. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ८६, दि. १६/१०/२०१७

४. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ३००, दि. २७/०९/२०१८

५. जाहिरात क्र. २२/२०२४ , क्र.वायसीएमएच/१३/कावि/६७/२०२४, दि. १२/०६/२०२४

६. मा. प्रशासक यांचेकडील मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ३८१०, दि. ३०/०७/२०२४

७. मा. आयुक्त सो, यांचेकडील दिनांक१२ /०८/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
क्र.वायसीएमएच/१३/कावि/ १६४/२०२४
दिनांक – १४/०८/२०२४

विषय – गट अ मधील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक गट ब मधील सहाय्यक प्राध्यापक ही पदे करार/ एकत्रित ठोक मानधनावर हंगामी स्वरुपात ३ वर्षाकरीता नियुक्ती करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त वाचले क्र. १ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विविध संवर्गातील ११८ पदांना मंजुरी मिळाली आहे. वाचले क्र. २,३ व ४ अन्वये सदरची पदे ३ वर्षे कालवधिकरीता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरणेकरीता मान्यता दिलेली आहे. सदर पदांपैकी भरलेली पदे व रिक्त राहिलेली पदे तसेच सदर संस्थेस आवश्यक असलेली पदे भरणेकामी उपरोक्त वाचले क्र. ५ अन्वये वर्तमानपत्रात व मनपाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रकटन प्रसिद करणेत आलेले होते. वाचले क्र. ६ अन्वये मा. स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने १४ पदनामांच्या ३२ पदांसाठी मुलाखती घेणेकामी निवड समितीने दि. ३१/०७/२०२४ रोजी पात्र उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेऊन जाहिरातीमध्ये नमुद असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, गुणांकन व इतर बाबी विचारात घेऊन गुणांकनानुसार खालील उमेदवारांची निवड प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या पदनामावर करण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांची आदेशाच्या दिनांकापासुन म्हणजे दिनांक - १६/०८/२०२४ ते दि. १५/०८/२०२७ या ०३ वर्षे कालावधीसाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहुण पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपात करार/ एकत्रित ठोक मानधनावर नियुक्ती देणेस मंजुरी देत आहे. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना देण्यात येणारे मानधन खालील स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

प्रपत्र अ

| अ.क्र. | नाव | नियुक्ती पद व विभाग | प्रवर्ग | निवड समितीने केलेल्या शिफारसीचा प्रवर्ग | दरमहा द्यावयाचे करार/ ठोक मानधन र.रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | डॉ. प्राची निलराज बकरे | सहयोगी प्राध्यापक, नेत्ररोग विभाग | इ.मा.व | खुला | १,७०,०००/- |
| २ | डॉ. दिपक सदाशिव पाटील | सहयोगी प्राध्यापक, सर्वसाधारण शल्यचिकित्सा विभाग | इ.मा.व. | खुला | १,७०,०००/- |
| ३ | डॉ. ईश्वर गोपाळराव पाटील | सहाय्यक प्राध्यापक, सर्वसाधारण शल्यचिकीत्सा विभाग | साशैमाप्र | साशैमाप्र | १,००,०००/- |
| ४ | डॉ. सौरभ प्रविण डुंबरे | सहाय्यक प्राध्यापक, सर्वसाधारण शल्यचिकीत्सा विभाग | इ.मा.व | इ.मा.व | १,००,०००/- |

CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | डॉ. निकीता श्रीवास्तवा | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन विभाग | खुला | खुला | १,००,०००/- |
| ६ | डॉ. राहुल दिगंबर गायकवाड | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन विभाग | अ.जा. | खुला | १,००,०००/- |
| ७ | डॉ. दिव्या गजाननराव शेळके | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन विभाग | इ.मा.व | इ.मा.व | १,००,०००/- |
| ८ | डॉ. अजय गणेश बनसोडे | सहाय्यक प्राध्यापक मेडीसीन विभाग | अ.जा. | अ.जा. | १,००,०००/- |
| ९ | डॉ. अपर्णा सतीशचंद्र मांडवेकर | सहाय्यक प्राध्यापक, पॅथॉलॉजी विभाग | खुला | खुला | १,००,०००/- |
| १० | डॉ. विनय कृष्णा पाटील | सहाय्यक प्राध्यापक, बालरोग चिकित्सा विभाग | इ.मा.व | इ.मा.व | १,००,०००/- |
| ११ | डॉ. पुर्वजा विजय कुबडे | सहाय्यक प्राध्यापक, बालरोग चिकित्सा विभाग | खुला | खुला | १,००,०००/- |
| १२ | डॉ. पद्मजा कुंभार | सहाय्यक प्राध्यापक, स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र विभाग | खुला | खुला | १,००,०००/- |
| १३ | डॉ. शिवाजी कैलासराव जायभाये | सहाय्यक प्राध्यापक, स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र विभाग | भ.ज.(ड) | भ.ज.(ड) | १,००,०००/- |
| १४ | डॉ. विजय प्रकाश यादव | सहाय्यक प्राध्यापक, अस्थिरोग शल्यचिकित्सा विभाग | खुला | खुला | १,००,०००/- |
| १५ | डॉ. मिताली संजय खोब्रागडे | सहाय्यक प्राध्यापक, भुलशास्त्र विभाग | खुला | खुला | १,००,०००/- |

अटी व शर्ती :-

१. नियुक्ती करणेत येणा-या उमेदवारांनी रुजू होताना ते कोणत्याही पदव्युत्तर संस्थेत / शैक्षणिक संस्थेत नोंदणी/ काम करत नसलेबाबत हमीपत्र / कार्यमुक्त आदेश (रिलीव्हींग ऑर्डर ) देणे बंधनकारक आहे.

२. नियुक्ती पदांवरील कामकाजाची वेळ इतर अध्यापकांप्रमाणे (पुर्णवेळ) राहिल.

३. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग (NMC) निर्धारित केलेली वैद्यकिय संस्थातील अध्यापकांसाठीची किमान अर्हता १९९८ (२०२४ पर्यंतच्या सुधारणांसहीत) नुमार उमेदवारांची पात्रता असावी.

४. नियुक्ती करणेत येणा-या उमेदवारांनी रुजु झालेनंतर सहा महिनेचे कालावधित एम.एस.सी.आय.टी सर्टीफीकेट संस्थेकडे सादर करणे अनिवार्य आहे. सादर न केल्यास सदर उमेदवारांचा सेवा कालावधि संपुष्टात येईल.

५. सर्व नेमणुका ह्या ३ वर्षासाठी हंगामी स्वरुपात आहेत. अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही. तसेच सदरच्या पदावर ज्या दिनांकास स्थायी अस्थापनेवर (सरळ सेवेने) अध्यापक नियुक्ती होईल त्या दिनांकास मानधनावरील अध्यापकांची सेवा संपुष्टात येईल.

६. सर्व पदांना अदा करणेत येणारे वेतन हे ७ व्या वेतन आयोगानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र. वेतन-२०१९/प्र.क्र.०३/२०१९/वैसेवा-२, ता. ३१ डिसेंबर २०२०, अन्वये (ठोक मानधन) व महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एसईसी-२०२१/प्र.क्र.१९९/२०१९/वैसेवा-३, दि. ०९ फेब्रुवारी २०२२ अन्वये करार पद्धतीने दरमहा ठोक मानधन अनुज्ञेय असल्याने अध्यापकांना व्यवसाय रोध भत्ता देय राहणार नाही. महापालिकेच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना लागु असणा-या सुविधा, हक्क, वेतनवाढ, अर्थिक व तद्अनुषंगिक अन्य कोणतेही लाभ देय राहणार नाहीत.

७. आठवड्यातुन फक्त एक दिवस साप्ताहिक सुट्टी राहिल. मानधन कालावधीत दीड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे एकूण ८ किरकोळ रजा एका वर्षासाठी देय राहतील. सार्वजनिक अथवा साप्ताहिक सुट्टीच्या ज्या

CamScanner

दिवशी रुग्णालयाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुट्टी उपभोगता येईल. तसेच सार्वजनिक सुट्टीचे दिवशी कामकाज करावे लागल्यास, केलेल्या कमकाजाबाबतचा कोणताही अर्थिक मोबदला/ फायदा देय राहणार नाहीत. तथापि, त्याची पर्यायी रजा उपभोगता येईल.

८. वरील पदांचे कामकाजावर अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांचे नियंत्रण राहिल.

९. मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडून सर्वांना नि:पक्षपातीने वागणूक मिळणे आवश्यक आहे.

१०.मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना देणे आपणावर बंधनकारक राहिल. अन्यथा आपणांस १ महिन्याचे मानधन महापालिका कोषागारात जमा करावे लागेल.

११.आपले कामकाज /वर्तणूक असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच आपण विनापरवाना गैरहजर राहिल्यास अथवा आपली हजेरी असमाधानकारक असल्यास मनपा सेवेची आवश्यकता नसलेचे समजणेत येऊन, कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास मानधनावरील नियुक्ती दिलेल्या पदाच्या जबाबदारीतुन कार्यमुक्त करणेत येईल.

१२. एकत्रित मानधना व्यतिरिक्त अन्य कोणतेही फायदे मिळणार नाहित व मासिक मानधन संबधित रुग्णालयामार्फत बँक ऑफ बडोदा, पिं.चिं.मनपा शाखा मध्ये ई.सी.एस. द्वारे बँक खात्यामध्य जमा केले जाईल.

१३. नियंत्रित प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहिल.

१४. उपरोक्त प्रमाणे मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे महापालिका आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवदेन सादर करणार नाही. किंवा तसा बाह्य दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करनार नाही. याबाबत विहित नमुन्यात (दोन साथीदारांसह संपुर्ण नाव व पत्ता नमुद करणे आवश्यक आहे.) हमीपत्र लिहुन द्यावे लागेल. मानधनावरील नेमणुक पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

१५. आयकर नियमाप्रमाणे मानधन रक्कमेतुन TDS वजा करुन अंतिम देय रक्कम अदा करण्यात येईल.

१६. महानगरपालिकेच्या अन्य कर्मचा-यांप्रमाणे हजेरी मस्टरवर स्वाक्षरी करणे/ बायोमेट्रीक रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असुन बायोमेट्रीक हजेरी तसेच राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाद्वारे (NMC) विहित बायोमेट्री रजिस्ट्रेशन करुन नियमित वेळेत NMC बायोमेट्री करणे बंधणकारक राहिल. बायोमेट्री विचारात घेऊन त्याप्रमाणे मानधन अदा केले जाईल.

१७. सदर उमेदवारांनी आदेशाच्या दिनांकापासुन ०७ दिवसाच्या आत पदव्युत्तर संस्था, वायसीएम रुग्णालयामध्ये रुजु व्हावे.

१८. सदर मुदतीत रुजु होतेवेळी कागदपत्रांच्या मुळ प्रती तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहिल. मुदतीत रुजु न झालेस आपणांस महापालिका सेवेची आवश्यकता नाही असे समजण्यात येऊन, तदनंतर सदर रिक्त पदावर अन्य उमेदवारांची / प्रतिक्षाधीन उमेदवाराची नेमणुक करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे – ४११०१८

प्रति,
२/- सर्व संबधित अध्यापक

प्रत –

१. लेखा विभाग
२. सामान्य प्रशासन विभाग
३. सर्व संबधित विभाग

CamScanner